# जिल्हाधिकारी अहमदनगर यांचे कार्यालय
## प्रस्तावित चारा डेपोसाठी चारा खरेदीसह वाहतुकीचे दर ठरविणेसाठी निविदा सुचना

**क्र.टंचाई/कार्या-१९-अ/१३३/२०१२** **अहमदनगर दिनांक-३१/०१/२०१२**

जिल्हाधिकारी अहमदनगर यांनी सन २०११ - २०१२ या वर्षात टंचाई सदृष्य परिस्थिती घोषित केलेल्या तालुक्यातील महसुल मंडळा अंतर्गत गावामध्ये उघडण्यात येणारे चारा डेपो करीता अंदाजे तालुकानिहाय वाळलेला/ओला चा-याची खरेदी करुन वाहतूक करणेसाठी सहकारी संस्था, कृषि उत्पन्न बाजार समित्या, दुध खरेदी-विक्री संघ, इतर सेवाभावी संस्था तसेच या कामाचा अनुभव असलेले नोंदणीकृत व्यवसायिक, ठेकेदार किंवा वाहतूक ठेकेदार किंवा चारा पुरवठा करणा-या व्यक्ती यांचेकडून जिल्हाधिकारी अहमदनगर मोहारबंद निविदा मागवित आहेत.. **कोरे निविदा फॉर्म रु.५०००/- (अक्षरी रुपये पाच हजार मात्र)** शासकिय खजिन्यात **'' ०२५० इतर सामाजिक सेवा, ८०० इतर जमा (रोख जमा) (०२५०००२८ ००)** या सदराखाली भरुन नायब तहसिलदार, टंचाई शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर येथे मिळतील. सदरची रक्कम परत मिळणार नाही.

| कोरे निवीदा फॉर्म विक्रीचा कालावधी | सीलबंद निविदा स्विकृतीचा अंतिम दिनांक व वेळ | सिलबंद निविदा उघडण्याचा दिनांक व वेळ |
|---|---|---|
| दिनांक - ०३/०२/२०१२<br>(वार - शुक्रवार) पासून<br>दिनांक - १६/०२/२०१२ वार-गुरुवार<br>(कार्यालयीन वेळेत, सुटीचे दिवस वगळून) | दिनांक - १७/०२/२०१२<br>(वार - शुक्रवार ) रोजी<br>दुपारी ४.०० वाजेपर्यंत<br>स्थळ-नायब तहसिलदार, टंचाई शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर | दिनांक - १८/०२/२०१२ रोजी<br>दुपारी ४.०० वा.<br>स्थळ-नियोजन भवन / नगर निवास, जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर |

१) निविदेच्या शर्ती व अटी जिल्हाधिकारी कार्यालय (टंचाई शाखा), अहमदनगर येथे कार्यालयीन वेळेत (सकाळी १०-०० ते दुपारी ५-३० पर्यंत ) विनामूल्य पाहवयास मिळतील.

२) निविदा सादर करताना निविदेसोबत **बयाणा रक्कम रुपये १,००,०००/- (अक्षरी रुपये एक लक्ष मात्र) चा तहसीलदार सामान्य प्रशासन, जिल्हाधिकारी कार्यालय अहमदनगर** यांचे नावे अहमदनगर येथे देय असलेला राष्ट्रीयकृत बँकेचा धनाकर्ष (डि.डि.) निविदेसोबत जोडणे आवश्यक आहे

३) निविदा फॉर्म पोष्टाने पाठविले जाणार नाहीत. तसेच मोहारबंद निविदा प्रत्यक्षात नायब तहसिलदार, टंचाई शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय,अहमदनगर येथे दिनांक १७/०२/२०१२ रोजी (वेळ ११.०० ते ४.००) या वेळेत स्विकृत करण्यात येतील.पोष्टाने प्राप्त होणा-या निविदा स्विकारल्या जाणार नाहीत.

४) मोहरबंद निविदा दिनांक- १८/०२/२०१२ (वार -शनिवार वेळ- दुपारी ४.०० वा.) नियोजन भवन /नगर निवास, जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर येथे उघडण्यात येतील.

५) निविदापूर्व बैठक दिनांक १३/०२/२०१२ रोजी (वार- सोमवार) वेळ दुपारी ४.०० वा. नियोजन भवन/निवासी उपजिल्हाधिकारी यांच्या दालनात घेण्यात येईल.

६) कामाचा कालावधी हा दिनांक फेब्रुवारी २०१२ ते ३० जून २०१२ अथवा टंचाई परिस्थिती संपेपर्यंत राहिल.

७) कोणतेही कारण न देता कोणतीही निविदा स्विकारणे अथवा नाकारणे किंवा निविदेच्या अटी व शर्ती मध्ये बदल करण्याचे अधिकार मा. जिल्हाधिकारी यांनी राखीव ठेवले आहेत.

८) प्रस्तुत निविदा ही **www.ahmednagar.nic.in** वर पाहावयास मिळेल.निविदा वेबसाईटवरुन डाउनलोड करुनही सादर करता येतील मात्र निविदा सादर करताना **रु.५०००/- '०२५० इतर सामाजिक सेवा, ८०० इतर जमा (रोख जमा) (०२५०००२८००)'** या लेखाशिर्षाखाली जमा केलेचे चलन किंवा तहसीलदार सामान्य प्रशासन, जिल्हाधिकारी कार्यालय अहमदनगर यांचे नावे अहमदनगर येथे देय असलेला राष्ट्रीयकृत बँकेचा धनाकर्ष (डि.डि.) सादर केल्या नंतरच निविदा स्विकारण्ेत येईल.

९) निविदेसंबंधी उपरोक्त तारखांमध्ये फेरबदल झाल्यास त्याची सुचना मुद्दा क्रमांक ८ मध्ये नमूद केलेल्या संकेत स्थळावर तसेच जिल्हाधिकारी अहमदनगर यांचे नोटीस बोर्डावर प्रसिध्द करणेत येईल.व्यक्तिगत सुचना देणेत येणार नाही याची नोंद घ्यावी.

जिल्हाधिकारी अहमदनगर

# जिल्हाधिकारी अहमदनगर यांचे कार्यालय
# चारा डेपोसाठी चारा खरेदीसह वाहतुकीचे दर ठरविणेसाठी निविदा सुचना

**क्र.टंचाई/कार्या-१९अ/१३३/२०१२ प्रस्तावना अहमदनगर दिनांक-३१ /०१/२०१२**

जिल्हाधिकारी अहमदनगर यांनी सन २०११ - २०१२ या वर्षात टंचाई सदृष्य परिस्थिती घोषित केलेल्या तालुक्यातील महसुल मंडळा अंतर्गत गावामध्ये उघडण्यात येणारे चारा डेपो करीता अंदाजे तालुकानिहाय वाळलेला व ओला चारा विकत घेवून पुरवठा करणे करिता सहकारी संस्था, कृषि उत्पन्न बाजार समित्या, दुध खरेदी-विक्री संघ, इतर सेवाभावी संस्था तसेच या कामाचा अनुभव असलेले नोंदणीकृत व्यवसायिक , ठेकेदार किंवा वाहतुक ठेकेदार किंवा चारा पुरवठा करणाऱ्या व्यक्ती यांचेकडुन जाहिररित्या दर मागविण्यात येत आहेत.

**निविदा मिळण्याचे ठिकाण -नायब तहसीलदार टंचाई शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय अहमदनगर-४१४ ००१.**

**निविदेची फॉर्म भरणेची पध्दत व फी**

निविदेचा नमुना नायब तहसीलदार, टंचाई शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर येथे दिनांक **०३/०२/२०१२** (वार-शुक्रवार) पासून दिनांक **१६/०२/२०१२** पर्यत कार्यालयीन कामकाजाचे दिवशी दुपारी **३.००** वाजेपर्यत रक्कम रुपये **५,०००**/- (अक्षरी रुपये पाच हजार मात्र) **०२५० इतर सामाजिक सेवा, ८०० इतर जमा (रोख जमा) (०२५०००२८००) या लेखाशिर्षाखाली** चलनाने भरणा करुन किंवा **तहसीलदार सामान्य प्रशासन, जिल्हाधिकारी कार्यालय अहमदनगर** यांचे नावे अहमदनगर येथे देय असलेला **राष्ट्रीयकृत बँकेचा धनाकर्ष** (डि.डि.) ना परतावा तत्वावर भरणा केलेनंतर मिळू शकेल.

**निविदेसोबत अनामत रक्कम (बयाणा रक्कम व सुरक्षा अनामत)-**

निविदा सादर करताना निविदेसोबत **बयाणा रक्कम रुपये १,००,०००**/- (अक्षरी रुपये एक लक्ष मात्र) चा तहसीलदार सामान्य प्रशासन, जिल्हाधिकारी कार्यालय अहमदनगर यांचे नावे अहमदनगर येथे देय असलेला **राष्ट्रीयकृत बँकेचा धनाकर्ष** (डि.डि.) सादर करावा लागेल.

ज्या निविदाधारकाची निविदा स्विकृत करण्यात येईल त्यास स्विकृतीचे पत्र दिल्यापासून ३ दिवसात रक्कम **रु.१०,००,०००/-** (अक्षरी रु.दहा लक्ष मात्र) ची **जिल्हाधिकारी अहमदनगर यांना देय असलेली राष्ट्रीयकृत बँकेची ३१/१२/२०१२ पर्यतची बँक गॅरंटी** सादर करावी लागेल. सदर राष्ट्रीयकृत बँकेची बँक गॅरंटी सादर केल्यानंतर निविदाधारकाने रुपये १००/- चे स्टॅम्प पेपरवर रितसर निविदेतील अटी व शर्ती मान्य असल्याचा करारनामा करुन द्यावा लागेल, त्यानंतर पुरवठा आदेश देण्यात येईल.

**निविदा स्विकारण्याची अंतिम दिनांक व वेळ**

१) निविदा दिनांक **१७/०२/२०१२** रोजी दुपारी **४-००** वाजेपर्यंत नायब तहसिलदार, टंचाई शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर येथे स्विकारली जाईल. त्यानंतर आलेल्या निविदांचा विचार केला जाणार नाही. सदरच्या निविदा दिनांक **१८/०२/२०१२** (वार- शनिवार) रोजी दुपारी **४-००** वाजता नियोजन भवन / नगर निवास, जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर येथे उघडण्यात येतील.

२) निवीदा प्रत्यक्ष नायब तहसिलदार, टंचाई शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर येथे आणून द्यावी लागतील. पोष्टाने प्राप्त होणा-या निवीदा स्विकारल्या जाणार नाहीत.

**निविदा सादर करण्याची पध्दती -**

निविदा ही दोन लिफाफे पध्दतीने सादर करावी लागेल. त्यापैकी लिफाफा क्र.१ हा तांत्रिक लिफाफा असेल व लिफाफा क्र.२ हा व्यापारी लिफाफा असेल. हे दोन्ही लिफाफे त्यातील कागदपत्रांसह सीलबंद करुन त्यावर स्पष्टपणे तांत्रिक लिफाफा / व्यापारी लिफाफा असे नमूद करणे आवश्यक आहे. हे दोन्ही सीलबंद लिफाफे तिस-या एका मोठया लिफाफ्यात ठेवून तो सीलबंद करावा व त्या लिफाफ्यावर जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगरकरिता चारा खरेदीसह वाहतूक निविदा २०११-२०१२ असे नमूद करण्यात यावे. तसेच प्रत्येक लिफाफ्यावर निविदा सादर करण्या-याचे नांव, पत्ता लिहिण्यात यावा.

निविदाकाराची स्वाक्षरी

**परिशिष्ट १**

**जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर**

चारा डेपोसाठी चारा खरेदीसह वाहतुकीचे दर ठरविणेसाठी तांत्रिक व व्यापारी लिफाफ्यात खालीलप्रमाणे कागदपत्रे सादर करावीत.

**लिफाफा क्र. १.** : तांत्रिक लिफाफा :- या लिफाफ्यामध्ये खालील कागदपत्रे असणे आवश्यक आहे.

१. बयाणा रक्कम रुपये १,००,०००/- (अक्षरी रुपये एक लक्ष मात्र) चा तहसीलदार सामान्य प्रशासन, जिल्हाधिकारी कार्यालय अहमदनगर यांचे नावे अहमदनगर येथे देय असलेला राष्ट्रीयकृत बँकेचा धनाकर्ष (डि.डि.) सादर करावा लागेल.

२. व्यवसायाचे नोंदणी प्रमाणपत्र, पॅनकार्ड, सन २०१०-११ या वर्षाचे आयकर विवरणपत्र भरलेबाबतची पोहच पावतीची साक्षांकित झेरॉक्स प्रत इत्यादी अदयावत कागदपत्र सादर करावीत.

३. किमान १० ट्रक स्वतःचे नावे अथवा वाहतुकदाराशी करारनामा केलेले (नियंत्रणा खालचे) असणे आवश्यक आहे.याशिवाय चारा डेपोच्या ठिकाणी पुरेसा व वेळेत चारा उपलब्ध करण्यासाठी मा.जिल्हाधिकारी वेळोवेळी निश्चित करतील तेवढी वाहने (ट्रक) उपलब्ध करुन देणेबाबत हमीपत्र

४. कोणत्याही शासकीय /निमशासकीय विभाग /कार्यालयाचे इतर कोणत्याही कामाच्या काळया यादीत समाविष्ट न केले बद्दल शपथपत्र. तसेच भारतीय दंड संहिताच्या कोणत्याही कलमान्वये शिक्षा झाली नसल्याचे शपथपत्र.

५. मालकीच्या व नियंत्रणाखालील ट्रकचे आर.सी.बुक साक्षांकित प्रत

६. निविदे सोबत सादर केलेले स्वतःच्या मालकीचे ट्रक व नियंत्रणाखालील ट्रक दुस-या जिल्हयातील तसेच इतर कोणत्याही वाहतुकीच्या कंत्राट /करारनाम्यासाठी उपयोगात आणले नसल्या संबंधीचे शपथपत्र.

७. नियंत्रणाखालील ट्रक मालकाचे चारा वाहतुकीसाठी ट्रक उपलब्ध करुन देण्यासंबंधीचे शपथपत्र.

८. निविदेसोबतच्या अत्यावश्यक कागदपत्राच्या /प्रमाणपत्राच्या छायाप्रति साक्षांकित /प्रमाणित केले असणे आवश्यक आहे.

९. निविदा धारक सहकारी संस्था असेलतर सहकारी संस्थेचे सर्व संचालकांचे संमितीपत्र सोबत सादर करावेत.

१०. मागील तीन वर्षाचे सनदीलेखापाल (सी.ए.) यांचे स्वाक्षरीचा लेखा परिक्षण तपासणी अहवाल.

११. निविदाधारक सहकारी संस्था असेल तर संस्था नोंदणी प्रमाणपत्र, बायलॉज, रोख भांडवलाचा तपशिल तसेच प्रपत्र ई सोबत जोडावे.

१२. वाहनाचा वाहन कर व विमा ३१/३/२०१२ पर्यंतच्या कालावधीचा भरणा केल्याबाबतचा लेखी पुरावा.

१३. निविदेचे अटी पत्रक मान्य असलेबाबत प्रपत्र ब प्रमाणे १०० रुपये स्टॅम्प पेपरवरील प्रतिज्ञापत्र.

१४. प्रपत्र क मध्ये नमूद केल्याप्रमाणे निविदाधारकाची माहिती.

१५. निविदाधारकाने एखाद्या व्यक्तीस निविदेवर स्वाक्षरी करण्यास प्राधिकृत केले असल्यास Bidder's Power of Attorney (प्रपत्र-ड) भरुन देणे आवश्यक आहे.

१६. मुळ निविदा फॉर्म (प्रत्येक पानावर निविदा धारकाने स्वाक्षरी करणे आवश्यक आहे.) दरसंबंधीचे परिशिष्ट-२ सोडून.

**वरील प्रमाणे १ ते १६ प्रमाणे कागदपत्रे परिपूर्ण असतील तरच लखोटा क्र. २ उघडला जाईल. याची नोंद घ्यावी.**

**लिफाफा क्र. २. :** व्यापारी दराचा लिफाफा

१) निविदेसोबत पुरविलेल्या विहित नमुन्यातील (परिशिष्ट -२ ) मध्ये चारा खरेदीसह वाहतूकीचे दर अंकी व अक्षरी नमूद करणे आवश्यक राहील.

२) दरासंबंधीचे निविदा फॉर्म मध्ये दर सादर करताना कोणतीही गिरवा गिरव किंवा खाडाखोड करण्यात येवू नये.

लिफाफा क्र.१ वर चारा खरेदीसह वाहतूकीचे दर ठरविण्यासाठी निविदा तांत्रिक लिफाफा क्र.१ असे स्पष्ट नमूद करावे. तसेच लिफाफा क्र.२ वर चारा खरेदीसह वाहतूकीचे दर ठरविण्यासाठी निविदा व्यापारी लिफाफा क्र.२ असे स्पष्टपणे नमूद करावे. वरील दोन्ही लिफाफे तिस-या एका मोठया लिफाफ्यात सिलबंद करुन जिल्हाधिकारी अहमदनगर यांचे नावे दिनांक १७/०२/२०१२ रोजी सायंकाळी ४.०० पर्यत जिल्हाधिकारी अहमदनगर यांची टंचाई शाखा यांचे कार्यालयात सादर करावा.

निविदा काराची स्वाक्षरी

**निविदाबाबतच्या इतर अटी व शर्ती पुढील प्रमाणे.**

१. ज्या निविदाधारकाची निविदा स्विकृत करण्यात येईल त्यास स्विकृतीचे पत्र दिल्यापासून ३ दिवसात रक्कम रु.१०,००,०००/- (अक्षरी रु.दहा लक्ष मात्र) ची जिल्हाधिकारी अहमदनगर यांना देय असलेली राष्ट्रीयकृत बँकेची ३१/१२/२०१२ पर्यतची बँक गॅरंटी सादर करावी लागेल. सदर राष्ट्रीयकृत बँकेची बँक गॅरंटी सादर केल्यानंतर निविदाधारकाने रुपये १००/- चे स्टॅम्प पेपरवर रितसर निविदेतील अटी व शर्ती मान्य असल्याचा करारनामा करुन द्यावा लागेल, त्यानंतर पुरवठा आदेश देण्यात येईल.

२. कंत्राट दाराचा कालावधी एक वर्षापर्यत अथवा चारा टंचाई सपेपर्यत यापैकी जे अगोदर असेल तो पर्यंत अंमलात राहिल.

३. चारा पुरवठा करण्याचे आदेश जिल्हाधिकारी अहमदनगर अथवा ते ज्या सक्षम अधिका-यांना प्राधिकृत करतील अशा अधिका-यांनी स्पष्ट लेखी आदेश दिलेल्या तारखेपासून तीन दिवसाचे आत नमूद केलेल्या ठिकाणी संबंधित चारा डेपोत पोहोच करावा लागेल. आवश्यकतेनुसार चारा पुरवठा करणे अथवा बंद करणेचे अधिकार प्राधिकृत अधिका-यांना रहातील.

४. ओल्या व वाळलेल्या चा-याचे खरेदीचे वाहतूकीसह दर परिशिष्ट- २ मध्ये सादर करण्यात यावे.

५. मा.जिल्हाधिकारी यांनी तालुक्यातील घोषित केलेल्या चारा डेपोवर पुरवठा धारकास चारा पुरवावा लागेल.

६. पुरवठा धारक /कंत्राटदार यांनी निविदा सादर करतेवेळी निविदेसोबत ज्या प्रकारच्या चा-याचा पुरवठा करावयाचा आहे त्या चा-याचा सिलबंद नमुना सोबत सादर करावा.निविदा सोबत सादर केलेले नमुन्या प्रमाणेच शेवट पर्यंत चा-याचा पुरवठा करणे कंत्राटदारावर बंधनकारक राहिल.

७. कंत्राटदारांनी निविदेत दिलेले दर निविदा उघडल्यापासून १२० दिवसापर्यंत विधीग्राहय राहतील.

८. टंचाई परिस्थितीमध्ये आवश्यकतेनुसार चा-याचा पुरवठा करावा लागेल.

९. चारा खरेदी करुन पुरवठा करताना काही वेळेस आवश्यकतेनुसार एखाद्या चारा डेपोसाठी ट्रकमधील पूर्ण चा-याची आवश्यकता नसल्यास आवश्यकते एवढा चारा सदर डेपोमध्ये उतरवून उर्वरीत चारा नजीकच्या दुस-या चारा डेपोमध्ये पुरवठा करावा लागेल त्यासाठी कोणताही वेगळा चार्ज दिला जाणार नाही.

१०. जर विधी ग्राहय २ किंवा अधिक निविदेमध्ये दिलेले दर सारखेच असतील तर या बाबत जिल्हाधिकारी यांचा निर्णय अंतिम राहिल.

११. निविदेसोबत शासकीय अटी शिवाय ठेकेदारांनी मांडलेली इतर कोणतीही अट स्विकारण्यात येणार नाही व तसा उल्लेख केल्यास निविदा रद्द करण्यात येईल.

१२. चारा पुरवठयाचे काम एकास किंवा विभागून देण्यात येईल.

१३. प्राप्त निविदेपैकी कोणतीही निविदा स्विकार करण्याचा व कोणतेही कारण न देता निविदा रद्द करण्याचा अधिकार जिल्हाधिकारी यांनी राखून ठेवले आहेत.

१४. शासन निर्णय महसूल व वनविभाग क्रं.एससीवाय/२०११/प्र.क्र.२१९/म-७ दि.२८/०९/२०११ मधील टंचाई परिस्थिती जाहिर करण्याबाबत दिलेल्या मार्गदर्शक सुचनेनुसार जिल्हाधिकारी अहमदनगर यांनी दिनांक ७/१०/२०११ रोजी टंचाई सदृश्य गावांची यादी घोषित केली असून, त्याचे तालुकानिहाय गावांची यादी जिल्हाधिकारी कार्यालय अहमदनगर (टंचाई शाखा) येथे पाहण्यास उपलब्ध आहे.भविष्यातील टंचाई सदृश्य परिस्थितीचा आढावा घेवून तालुक्यातील गावांची संख्या कमी /जास्त करणेचे अधिकार जिल्हाधिकारी यांना राहतील.

१५. निविदाधारकाला संपूर्ण जिल्ह्यात तालुक्यातील ज्या ठिकाणी भविष्यात चारा डेपो सुरु करण्यात येतील त्या ठिकाणी निविदाधारकाने खरेदी केलेला चारा पोहच करावा लागेल. तसेच चा-याची भराई व उतराई निविदाधारकानेच करावयाची आहे.

१६. चा-याचा पुरवठयाबाबत आवश्यकते प्रमाणे आदेश देणेत येतील ही आवश्यकता जिल्हाधिकारी किंवा त्यांनी प्राधिकृत केलेले अधिकारी ठरवतील.याबाबत कंत्राटदारास एकूण किती चारा पुरवावा लागेल हे भविष्यात होणारे चारा टंचाई परिस्थितीवर अवलंवून राहिल.

१७. चारा पुरवठा करण्याकरीता वाहतूकीच्या वाहनांची स्वच्छता राखणे, दुरुस्त ठेवणे व जनावरांना खाण्यास योग्य अशा सकस चा-याचा पुरवठा करणे. यासाठी कंत्राटदार जबाबदार राहतील.

निविदा काराची स्वाक्षरी

१८. ज्या निविदाधारकाची निविदा स्विकृत करण्यात आली आहे त्याने विहित वेळेत काम करण्यास नकार दिल्यास त्याची बयाणा रक्कम जप्त करण्यात येईल.

१९. पुरवठादार यांनी पुरवठा केलेला चारा जनावरांना खाण्यास योग्य असलेबाबत सक्षम अधिकारी यांचे प्रमाणपत्र दिल्याशिवाय कंत्राटदार यांना देयकाची अदायगी करता येणार नाही.

२०. प्रत्येक चारा डेपोमध्ये चा-याचे नमुने ठेवणे आवश्यक आहे.त्याच प्रमाणे चा-याचा पुरवठा करणे बंधनकारक आहे.

२१. चारा पुरवठा करताना होणा-या नुकसानी बाबत जसे अपघात,आग लागणे किंवा इतर नैसर्गिक अथवा मानव निर्मित आपत्तीमुळे कंत्राटदारच्या होणा-या नुकसानी बाबतची भरपाई कंत्राटदाराला दिली जाणार नाही.

२२. कंत्राटदारांनी स्पष्ट लेखी आदेश नसताना चारा पुरवठा केल्यास त्या बाबतचा मोबदला देता येणार नाही.

२३. चारा पुरवठा बाबत शासनाकडून उपलब्ध होणा-या अनुदानानुसार पुरवठा आदेशा प्रमाणे चारा पुरवठा पुर्ण झाल्यानंतर देयके कार्यालयास सादर केल्यानंतर नियमानुसार देयकांची छाननी करुन रकमा वितरीत करण्यात येतील.

२४. जिल्हाधिकारी किंवा प्राधिकृत प्रतिनिधी यांनी आदेश दिल्यानंतर ३ दिवसाचे आत चा-याचा पुरवठा मागणीनुसार सुरु करावा लागेल. सदर कालावधीत चारा उपलब्ध न केल्यास प्रतीदिन रु.५०००/- याप्रमाणे पहिल्या ५ दिवसा-साठी दंड व त्यापुढील ५ दिवसासाठी प्रतीदिन रु.१०,०००/- या प्रमाणे दंडाची आकारणी करण्यात येईल व सदर दंड सुरक्षा अनामत (बँक गँरंटी) व देय बिलामधून वसुल करण्यात येईल. तसेच १० दिवसानंतर पुरवठा न केल्यास आपला करार रद्द करण्यात येईल व दुस-या पुरवठादाराकडून चा-याच्या खरेदीसह पुरवठा करुन घेण्याची व्यवस्था करण्यात येईल. व त्यामुळे होणा-या संपूर्ण नुकसानीची भरपाई आपल्या अनामत सुरक्षा (बँक गॅरंटी) व देय रकमेतून वसूल करण्यात येईल.

२५. जिल्हाधिकारी किंवा प्राधिकृत प्रतिनिधी यांनी आदेश दिल्यानंतर चारा पुरवठा न केल्यास अथवा चारा पुरवठयाचे काम असमाधान कारक असल्याचे आढळून आल्यास किंवा निविदेतील कोणत्याही अटीचा भंग केल्यास कंत्राटदारास दिलेले काम काढून घेण्याचा अधिकार जिल्हाधिकारी यांना राहिल व चारा पुरवठयासाठी दुस-या कंत्राटदाराकडून काम करुन घेतले जाईल.परिणामी होणा-या नुकसानीची भरपाई संबंधीत पुरवठा धारकाकडून वसूल करण्यात येईल.

२६. कंत्राटदारास निविदेच्या कालावधीत दररोज काम देणे बंधनकारक राहणार नाही. आवश्यकते नुसार चारा पुरवठा आदेश देणेत येतील.अहमदनगर जिल्हयातील निर्माण होणा-या चारा टंचाई परिस्थिती नुसार तालुक्यातील चारा डेपो संख्या मध्ये आवश्यक तो बदल करण्याचा अधिकार जिल्हाधिकारी यांना राहिल.

२७. शासकीय नियमावलीत वेळोवेळी होणा-या बदलानुसार अथवा प्रशासकीय आदेशाप्रमाणे होणा-या बदलानुसार जिल्हाधिकारी कार्यालय अहमदनगर यांनी केलेल्या सुचना व अटींचे पालन करणे पुरवठादार/ठेकेदारांवर बंधन-कारक राहिल.

२८. पुरविण्यात येणा-या चा-याचे ठेकेदाराने या कार्यालयाकडून नेमलेल्या कर्मचा-याचें समक्ष नेमून दिलेल्या वजन काटयावर वजन करणेचे आहे. रिकामे ट्रक व चा-यासह ट्रकचे वजन नेमून दिलेल्या वजन काटयावर करावयाचे आहे.त्यासाठी येणारा खर्च चारा पुरवठा करणा-या निविदाधारक ठेकेदाराने करावयाचा आहे.

२९. पुरवठा करण्यात येणारा चारा जनावरांना खाणेस योग्य नसलेस अथवा शासनाचे पशुसंवर्धन विभागाने विहित केलेल्या निकषानुसार खाणेस योग्य नसलेस पुरवठा करणेत आलेला संपूर्ण चारा नाकारण्याची संपूर्ण अधिकार जिल्हाधिकारी अहमदनगर यांना आहेत. त्यासाठी फेर वाहतूकीची खर्चाची कुठल्याही प्रकारची अदायगी केली जाणार नाही.

३०. चारा साठविण्याचे ठिकाण हे संबंधित तहसिलदार यांनी निश्चित केलेल्या ठिकाणीच चारा पुरवठा करावा लागेल. अन्यत्र केलेल्या चारा पुरवठयाचे प्रदान केले जाणार नाही.

३१. जिल्हाधिकारी अहमदनगर यांना ठेकेदाराचा चारा पुरवठा असमाधान कारक आढळून आल्यास काम बंद करण्याचा अथवा तत्सम दुसरी कार्यवाही करण्याचा अधिकार राहिल.अशा वेळी बँक गॅरंटीची रक्कम जप्त करणे व नविन निविदा मागणेच्या दृष्टीने कार्यवाही करणेत येईल.

३२. कंत्राटदाराला देयकाची अदायगी करताना नियमानुसार आयकर कपात करण्यात येईल.

निविदा काराची स्वाक्षरी

३३. निविदाधारकाने सादर करावयाचे दर हे सर्व करासहीत (सर्वसमावेशक) असावेत सदर दराव्यतिरिक्त कोणत्याही प्रकारचा कर/चार्ज देयकात आकारता येणार नाही.

३४. चारा पुरविण्यासाठी किंवा वाहतुकीसाठी रोख अथवा आगाऊ रक्कम दिली जाणार नाही.

३५ उपरोक्त प्रक्रियेमध्ये ठेकेदाराचे निष्काळजीपणामुळे किंवा प्रतिनिधीने गैरव्यव्हार किंवा काळा बाजार केल्यामुळे शासनाच्या होणा-या नुकसानीची रक्कम ठेकेदारांकडून वसूल करणेत येईल.

३६. ट्रक मध्ये चारा भरणे व चारा डेपोचे ठिक्राणी चारा खाली करणेची जबाबदारी ठेकेदाराची असेल. दर सादर करताना सदर बाबीचा विचार करुन चारा खरेदी व वाहतूकीचे दर सादर करावेत.

३७. शासनाने वेळोवेळी केलेल्या सुधारणा व आदेश ठेकेदारावर बंधनकारक राहतील.

३८. चा-याच्या पुरवठयात भेसळ ( नमुन्या प्रमाणे नसलेला व काळा चारा ) आढळून आल्यास भेसळ प्रतिबंधक तरतुदीनुसार योग्य ती कार्यवाही करणेचे अधिकार कार्यालयास राहतील आणि त्यासाठी येणारा ज्यादा खर्च निविदा धारकाकडून वसुल करणेत येईल.

३९. चारा डेपोवर संबंधीत तहसीलदार यांनी प्रधिकृत केलेल्या अधिका-याचे प्रमाणपत्रानुसार बिले अदा करण्यात येईल.

४०. प्रत्येक डेपोला पुरवठा करावयाचा चारा जिल्हास्तरीय चारा डेपो व्यवस्थापन समिती ठरवून देईल.

४१. पुरविलेल्या चा-याबाबत साठवणूक रजिष्टर मध्ये साठा नोंद तसेच प्रत्येक वाहनाची रोजनिशी जिल्हाधिकारी यांनी नेमूण दिलेले सक्षम अधिकारी हे ठरवतील. पुरवठयाबाबत सक्षम अधिकारी यांनी प्रमाणित केल्या नंतरच देयक अदा केले जाईल.

४२ वरील अटींचा भंग केल्यास अथवा त्यानुसार कार्यवाही न केल्याचे निर्दशनास आल्यास होणारी दंडात्मक कारवाई व कंत्राट रद्द करण्याचे जिल्हाधिकारी यांनी राखून ठेवलेले अधिकार मला /आम्हाला मान्य राहतील.

४३. चारा पुरवठयाबाबत ( वाहतूकीसह /वाहतूक ) मान्य निविदाकारासोबत करण्यात येणारे करारनाम्याचा नमूद कालावधी पूर्ण झालेवर ६ महिने नंतर पुरवठादार विरुध्द काही तक्रार नसल्याचे खातरजमा करुन पुरवठादारा कडून इंडेग्नींटी बॉण्ड घेवून बँक गॅरंटी रक्कम परत केली जाईल.

४४. चारा उपलब्धता पाहूनच माझी /आमची खात्री करुनच निविदा भरण्यात आलेली आहे.

वरील सर्व अटी व शर्ती मी /आम्ही काळजीपुर्वक वाचल्या असून,त्या मला/आम्हाला मान्य आहेत.

स्थळ:- अहमदनगर

निविदाधारकाची स्वाक्षरी
निविदाधारकाचे नाव व संपूर्ण पत्ता

**टिप :-** उपरोक्त अटी व शर्तीचा नमुना प्रत्येक पानावर निविदा धारकाने सही करुन शिक्का मारुन निविदे सोबत सादर केला पाहिजे.

## परिशिष्ट २
## लिफाफा क्र.२ (व्यापारी लिफाफा)

निविदाधारकाचे नांवः-

संपूर्ण पत्ताः-

**चारा खरेदीसह वाहतुकीचा दर**

**तक्ताः१**

| अ.नं. | चा-याचा प्रकार | प्रस्तावित चारा डेपोचे ठिकाणी पोहच वाहतूकीसह चारा खरेदी दर प्रति मेट्रीक टन रुपये |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १ | वाळलेला शाळू | |
| २ | ज्वारीचा नविन कडबा, वाळलेला हायब्रीड, ज्वारीचा नवीन कडबा | |
| ३ | वाळलेल्या गवताचा चाप | |
| ४ | कडबा कुट्टी | |
| ५ | इतर कुट्टी | |
| ६ | ओला चारा (ऊस वाडे) | |
| ७ | ओला चारा (ऊस) | |
| ८ | ओला चारा (मका) | |
| ९ | ओला चारा (कडवळ) | |

**टिप :-** (१) तक्ता १ प्रमाणे चा-याचा खरेदी व वाहतूकीसह एकत्रित प्रति मेट्रीक टन दर हा अंकामध्ये व अक्षरी सुस्पष्टपणे दर्शविण्यात यावा. निवेदेतील न्युनतम दर हे चा-याचा प्रति मे.टन दर वाहतुकीसह रक्कमेवर निश्चित करणेत येईल.

(२) नमूद करावयाचे दर प्रस्तावित चारा डेपोच्या ठिकाणी पोहच करणे, चढाई, उतराई व सर्व कर व अनुषंगिक खर्च अंतर्भूत करुन टाकावेत.

ठिकाणः-

दिनांक :-

निविदा सादर करणा-याचे संपूर्ण
नांव व स्वाक्षरी

प्रपत्र-ब-

( १०० रुपये स्टॅम्प पेपरवर द्यावयाचा मजकूर )

मी, --------------------------------------------------------------------------------------------------------------------- ------------------------------------------- याद्वारे शपथेवर निवेदन करतो की, मी मा.जिल्हाधिकारी अहमदनगर यांनी अहमदनगर जिल्ह्यातील तालुक्यातील मंडळनिहाय चारा डेपोला आवश्यक लागणारा चारा टंचाई अंतर्गत दि. / /२०१२ रोजी काढलेल्या चारा खरेदीसह वाहतूकीचे निविदेतील अटी व शर्ती पूर्णपणे वाचून समजावून घेतलेल्या आहेत. ओला/वाळलेला चारा खरेदीसह वहातूक निविदेतील अटी आणि शर्ती मला मंजूर असून त्या अटी व शर्तीचे मी पूर्णपणे पालन करील.

मी असेही शपथेवर निवेदन करतो की, चारा टंचाई ही अतिसंवेदनशील बाब असल्याचे मला मान्य आहे. मी अहमदनगर जिल्ह्यातील तालुक्यातील चारा डेपोकरीता लागणारा चारा खरेदीसह वाहतूक निविदा मंजूर झाल्यास आवश्यकतेनुसार माझे स्वतःचे अथवा ट्रक मालकासोबत केलेल्या करारनाम्याच्या आधारे इंधनासह वाहने पुरविल.

वरील मजकूर माझे माहितीप्रमाणे खरा व सत्य आहे. मी आवश्यकतेप्रमाणे वाहने न पुरविल्यास निविदेत नमूद केलेल्या अटी आणि शर्तीनुसार दंडणीय कार्यवाहीस पात्र राहील. तसेच ट्रक न पुरविल्यास मी भा.द.वि.कलम १९९ व २०० प्रमाणे शिक्षेस पात्र राहील. सदर मजकूर मी आज दि. / /२०१२ रोजी मुक्कामी प्रमाणित केलेला आहे.

निविदा धारक यांची स्वाक्षरी
संपूर्ण नांव व पत्ता.

( सदरचा मजकूर विशेष कार्यकारी दंडाधिकारी, अहमदनगर यांचेसमोर नोंदविलेला असावा.)

(प्रपत्र-क)

Bidder’s Information

**IN RESPONSE TO THE PRIVATE FODDER PURCHASE & SUPPLY BY TRUCK TENDER NOTICE PUBLISHED BY THE COLLECTOR, AHMEDNAGAR READ WITH TERMS & CONDITIONS CONTAINED IN THE TENDER FORM**

1. Name in Full of the Tenderer :

   (in Block Letters)

2. Address of the Tenderer :

   :

   :

Telephone No. : office ..............................

: Residence ........................

Mobile No. :

Fax No. :

3. Address for Communication :

Telephone No. : office Resi. ............................

Mobile No. :

Fax No. :

I / We have carefully read and understood the above terms and conditions of the Tender attached to this offer and form part of this Tender, which we accept unconditionally and accordingly, offer the price as above mentioned.

**Signature :------------------------**

**Name :**

**Date :**
**Designation :**
**Seal / Rubber Stamp**
**of Organization**

(प्रपत्र-ड)

## BIDDER'S POWER OF ATTORNEY

To,

<Bidder's Name>----------------------------------------------------------------------, <Designation>------------------------------is hereby authorized to sign relevant documents on behalf of the company in dealing with Tender of reference <Tender No. & Date>-----------------------------. He is also authorized to attend meetings & submit technical & commercial information as may be required by your in the course of processing above said tender.

Thanking You,

Authorized Signatory.

-------------------------------------------------------------

Tenderers
Seal

**( प्रपत्र -ई)**

**Banker's / CA's Certificate for Investible Funds**

Ref :-------------------------------------------- Date : ----------------------

To,

In response to the Tender No. ---------------------------------dt.---------------- - of the, Ahmednagar --------------------------------- of The Private Fodder Supply By Truck Tender, this is to certify that -------------------------------- ---------------------------------------(Name of Bidder) is having balance of Rs. -----------------------------in their account & are capable of investing funds to the extent of Rs. ------------------------------(Ruppes ---------------------------------------------------------) for the said tender.

DATE :

PLACE: SIGNATURE :

Taluka / FDO.

------------------------------------

(BANK'S COMMON SEAL)